वर्ष-०७ | अंक-३१ | मुंबई, मंगळवार २२ ते २८ जून २०२१ | पृष्ठ-४

मूल्य २/- रुपये

# पोलीस बातमी पत्र

मराठी साप्ताहिक
R.N.I. No. MAHMAR/2014/60133
POSTAL REGISTRATION NO. PLG/205/2019-2021

●संपादक : दिपक मोरेश्वर नाईक ●कार्यकारी संपादक : गुरु प्रसाद नाईक

PG 2 कामाचा ताण असह्य झाला; फायनान्स कंपनीच्या मॅनेजरची आत्महत्या

3 → या जिल्ह्यातील बँकेत मोठा घोटाळा- 11 जणांवर गुन्हे दाखल; तिघांना अटक, इतर फरार

नवी मुंबई विमानतळाला छत्रपती शिवाजी महाराजांचंच नाव असावं - राज ठाकरे ← 4

www.policebatmipatra.com / policebatmipatra.in policebatmipatra@gmail.com FOLLOW US! https://policebatmipatra.page

## शिवसेनेचा भाजपच्या बालेकिल्ल्यावर सर्जिकल स्ट्राईक

# मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत 10 नगरसेवकांचा सेनेत प्रवेश






मुंबई, वर्धा जिल्ह्यातील हिंगणघाट नगर परिषदेतील 10 नगरसेवक आणि दोन माजी नगरसेवक अशा बारा जणांनी सर्जिकल स्ट्राईक करीत शिवसेनेत प्रवेश केला आहे. याशिवाय भाजप युवा मोर्चाच्या काही पदाधिकाऱ्यांनी देखील शिवसेनेत प्रवेश केला आहे. विदर्भातील हिंगणघाट नगरपालिकेतील उपाध्यक्ष चंद्रकांत घुसे यांच्यासह भाजपचे विद्यमान १० नगरसेवक आणि २ माजी नगरसेवक यांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत पक्ष प्रवेश केला आहे. हिंगणघाट येथे 38 नगरसेवक आहेत त्याच्या पैकी 28 नगरसेवक भाजपचे होते. हिंगणघाट नगरपालिकेवर सध्या भाजपचीच सत्ता आहे, असं असतानाही भाजपचे 10 विद्यमान नगरसेवकांनी सेनेत प्रवेश केला आहे. याशिवाय आणखी काही नगरसेवक सेनेत प्रवेश घेणार असल्याचंही सांगितलं जात आहे. उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून त्यांनी सेनेत प्रवेश केल्याचं सांगितलं जात आहे. आणखी पंचायत समिती आणि अन्य अनेक जणं सेनेत प्रवेश करणार आहेत. भविष्यामध्ये वर्धा जिल्ह्यामध्ये शिवसेना भक्कम कशी करावी यासाठी ...पान २ वर...

**काही दिवसांपूर्वी जळगावमध्ये सुद्धा शिवसेनेनं भाजपला मोठा दणका दिला होता.**

## काकांच्या अंत्यविधीसाठी येणं तरुणाला पडलं महागात; चार वर्षापासून बेपत्ता असलेले दोघे पोलिसांच्या जाळ्यात



कल्याण, कल्याणमधील एक तरुण एका तरुणाला आणि एका विवाहितेला काकांच्या अंत्यसंस्काराला येणं चांगलंच महागात पडलं आहे. अंबरनाथमध्ये एका कंपनीत काम करणारी विवाहिता आणि एक तरुण चार वर्षांपूर्वी अचानक बेपत्ता झाले. मात्र यातील बेपत्ता तरुण आपल्या काकांच्या अंत्यविधी साठी कल्याणमध्ये आला आणि पोलिसांच्या जाळयात अडकला. अंबरनाथमध्ये एका कंपनीत कल्याण पश्चिमेतील रोहिदास वाडा परिसरात राहणारा शाहबाज शेख काम करीत होता. त्याच्यासोबत अंबरनाथमध्ये राहणारी ही विवाहिता सीमा कोष्टी काम करीत होती. पतीसोबत राहणारी सीमा 30 मे 2017 रोजी आपल्या मनमाड येथील माहेरुन अंबरनाथ येथे परत येण्यासाठी ट्रेनमध्ये बसली आणि अचानक गायब झाली. ती हरविल्याची तक्रार तिच्या नातेवाईकांनी मनमाड पोलिस ठाण्यात केली. पोलिसांनी सिमाचा तब्बल चार वर्षे शोध घेतला, मात्र काहीच ...पान २ वर...

## मोबाइल गेम्ससाठी वापरले आईच्या खात्यातील पैसे; रागावल्यामुळे मुलाने सोडले घर अन्...



औरंगाबाद, एका बँकेच्या खात्यातून सातत्याने काही रक्कम कमी होत होती. पासबुकवरून माहिती घेतली असता, ही रक्कम २१, १०० रुपये अशा छोट्या स्वरूपाची होती आणि युरोनेट नावाच्या खात्यावर जात होती. त्यावर, तिने चौकशी केली असताना, ही रक्कम तिचा मुलगा मोबाइल गेम खेळताना वापरत होता. आईने त्या मुलाला त्यावरून रागावले असता, तो राग मनात धरून घरातून निघून गेला. अखेर या महिलेने पोलिसांमध्ये तक्रार केली आणि पोलिसांनी तातडीने तपास करत या मुलाचा शोध घेतला.ही घटना घडली १६ जून रोजी. या प्रकरणात सहायक पोलिस निरीक्षक घनश्याम सोनवणे यांनी माहिती दिली. एका महिलेने पोलिस स्टेशनला येऊन तिचा मुलगा घरातून निघून गेल्याची तक्रार पोलिस ठाण्यात दाखल केली होती. या मुलाच्या शोधासाठी पोलिस अंमलदार गोलवाल, खराडकर आणि डोईफोडे यांनी मुलाचा शोध घेण्यास सुरुवात केली. शहरातील 'सेफ सिटी'अंतर्गत असलेल्या विविध कॅमेऱ्यांची मदत घेण्यात आली. त्यामध्ये सीबीएस परिसराची पाहणी रकत अताना तो मुलगा त्यांना दिसला. पोलिसांनी तत्काळ धाव घेत या मुलाला ताब्यात घेतले आणि त्याची चौकशी केली. ...पान २ वर...

## महाविकास आघाडीचा 'तो' नियम सांगून राष्ट्रवादीनं फेटाळला सरनाईकांचा आरोप



आमदार प्रताप सरनाईक यांच्या लेटर बॉम्बचा वापर करून महाविकास आघाडी अस्थिर करण्याचा प्रयत्न भाजप करत आहे, पण त्यांचा हा प्रयत्न यशस्वी होणार नाही. डोक्यावर हात ठेवून सांगतो की हे सरकार पाच नव्हे ३५ वर्षे कायम राहील,' असा विश्वास ग्राम विकास मंत्री हसन मुश्रीफ b यांनी आज कोल्हापुरात व्यक्त केला. 'आम्ही शिवसेनेला मोठ्या मनानं सांभाळत आहोत, त्यामुळे शिवसेनेला कमजोर करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही,' असंही ते म्हणाले.

आमदार सरनाईक यांच्या लेटर बॉम्ब नंतर राज्यात राजकीय खळबळ उडाली आहे. या पार्श्वभूमीवर पत्रकारांशी बोलताना ग्राम विकास मंत्री मुश्रीफ म्हणाले, भाजपने गेली दोन-तीन महिने आमदार सरनाईक यांच्या मागे चौकशीचा ससेमिरा लावला आहे. त्यातूनच त्यांनी हे मुख्यमंत्र्यांना पत्र पाठवले. त्यामध्ये आम्ही सेनेचे आमदार फोडत आहोत असा आरोप केला, पण हा आरोप पूर्णपणे निराधार व चुकीचा आहे. महाविकास आघाडी स्थापन करताना शिवसेनेचे कार्यकर्ते किंवा नेते फोडायचे नाहीत असा नियमच झाला होता. काँग्रेस आणि राष्ट्रवादीचे एकमेकांनी नेते फोडायचे, पण शिवसेनेला हात लावायचा नाही हा नियम असताना आम्ही सेनेचे नुकसान कसे करू असा सवालही त्यांनी केला. कोल्हापूर जिल्हा परिषदेत शिवसेनेचे दहा सदस्य असताना त्यांना तीन पदे दिली, गोकुळ दूध संघात सहा जागा दिल्या अशी पुस्तीही त्यांनी जोडली. मुश्रीफ म्हणाले,...पान २ वर...

## औरंगाबाद महापालिका कर्मचाऱ्याला केली मारहाण



औरंगाबाद : हॉटेलसमोर कचरा टाकल्याने डस्टबिन ठेवण्यासाठी नोटीस बजावल्याने चौघांनी पालिकेच्या सुपरवायझरला मारहाण केली. या प्रकरणात पोलिसांनी महंमद सद्दाम हुसैन महंमद इमादउद्दीन (३०), महंमद रजा रहेमान महंमद इमादउद्दीन (२२, रा. दोघे, फाजलपुरा, मेट्रो हॉटेल) या दोघांना अटक केली. अटक केलेल्या दोघांची रवानगी हर्सूल कारागृहात करण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत.

महापालिका झोन क्र. ४ व वॉर्ड क्र. ११ येथील सुपरवायझर इस्माइल शमशू पठाण (४२, रा. विद्युत कॉलनी) यांनी तक्रार दिली. ६ मार्च रोजी स्मार्ट सिटी अंतर्गत शहर स्वच्छ अभियान मोहिमेत पाहणी करीत असताना हॉटेलसमोर कचरा टाकलेला आढळला. त्यामुळे कचरा टाकू नये, म्हणून नोटीस बजावण्यात आली. त्यामुळे मेट्रो बिल्डिंगचे मालक महंमद इमादउद्दीन मो. इब्राहिम व त्याच्या मुलांनी असे चौघांनी इस्माइल पठाण यांना तू नोटीस का बजावली, असा जाब विचारून शिवीगाळ करून फावड्याच्या दांड्याने मारहाण केली.

## अजित पवारांच्या कार्यक्रमात झालेली गर्दी पडली महागात

### राष्ट्रवादीच्या १५० कार्यकर्त्यांवर गुन्हा

करोना संसर्गाच्या पार्श्वभूमीवर गर्दी टाळण्याचे महापालिका आयुक्तांच्या आदेशाला वाटाण्याच्या अक्षता लावल्याप्रकरणी राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप, नीलेश निकम, बाळासाहेब बोडके, प्रदीप देशमुख, रोहन पायगुडे, महेश हांडे यांच्यासह १५० कार्यकर्त्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अजित पवार यांच्या उपस्थितीत शनिवारी झालेल्या शहर कार्यालयाच्या उद्घाटनप्रसंगी मोठ्या संख्येने कार्यकर्ते जमले होते. पवार यांनी कार्यक्रमात दिलगिरीही व्यक्त केली. मात्र, या प्रकारावर चहुबाजूंनी टीकेची झोड उठल्यानंतर शिवाजीनगर पोलिसांनी गुन्हा दाखल करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार पोलिस कर्मचारी दिनेश वीर यांनी तक्रार दाखल केली आहे. पोलिसांनी शहर राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांसह




कार्यकर्त्यांवर राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५, महाराष्ट्र कोव्हिड उपाययोजना २०२० या कायद्यातील कलमांन्वये गुन्हा दाखल केला आहे.राष्ट्रवादी काँग्रेसच्या नूतन मध्यवर्ती कार्यालयाचा उद्घाटन सोहळा शिवाजीनगर परिसरातील डेंगळे पूल येथील धनश्री अपार्टमेंट येथे आयोजित शनिवारी सायंकाळी आयोजित करण्यात आला. उपमुख्यमंत्री पवार यांच्या हस्ते नव्या कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले. ...पान २ वर...

## लग्नाच्या पवित्र बंधनाला काळिमा हुंडा घेतला एकीकडून लग्न केले दुसरीसोबत; डॉक्टरचा प्रताप



लातूर : डॉक्टर हे आपल्या समाज्यातील एक अत्यन्त जबाबदार व्यक्तिमक्त आहे तरीही काही महाभाग याला काळीमा फासतात असेच काही घडले आहे लातूर जिल्ह्यात . लातूर जिल्ह्यातील साकोळ (ता.शिरूर , अनंतपाळ ) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात कार्यरत असलेल्या डॉ . संदीप वसंतराव मंत्रे (रा. सोमश्वर नगर,परळी ) असे त्या वैद्यकीय अधिकाऱ्याचे नाव आहे . डॉ. संदीप यांनी गेल्यावर्षी १८ सप्टेंबर रोजी मुलीच्या म्हणजेच फिर्यादीच्या वडिलांच्या घरी जाऊन मी सध्या वैद्यकीय अधिकारी आहे असे सांगून मला तुमच्या मुली बरोबर लग्न करायचे आहे असे सांगून तिला लग्नाची मागणी घातली . मुलीचे वडील यामुळे खुश झाले . पण संदीप ने सांगितले कि मला लातूर ला रुग्णालय सुरु करायचे आहे व त्यासाठी मला सात लाख रुपये द्यावे . अशी त्याने अट ठेवली. मुलगा डॉ .आहे व तो स्वतः मागणी घातली असल्याने आपल्या मुलीचे भविष्य चांगले होईल अशा आशेने मुलीच्या वडिलांनी संदीप सोबत लग्न जमवले . त्यानुसार २३ सप्टेंबर रोजी काही मोजक्याच नातेवाईकाच्या उपस्थितीत साखरपुडा करून घेतला. २१ ऑक्टोबर रोजी ठरल्याप्रमाणे मुलीच्या वडिलांनी सात लाख रुपये संदीपच्या घरी नेऊन त्यांच्या वडिलांकडे सुपूर्द केले आणि लग्न यावर्षी ५ मे रोजी ठरले . त्याप्रमाणे मुलीच्या वडिलांनी लग्नाची जोरदार तयारी सुरु केली . मात्र २३ मार्च पासून संदीप ने आपला मोबाइल बंद केला . अखेर ४ एप्रिल रोजी संदीप ने त्याचे दुसऱ्या मुलीसोबत लग्न झाल्याचे व्हाट्सअप वर सांगून लग्नास नकार दिला . या प्रकरणी मुलीच्या वडिलांनी डॉ . संदीप विरुद्ध फसवणुकीचा गुन्हा नोंद केला. संदीप ने हुंडा घेतलेल्या मुलीच्या कुटूंबियांना अंधारात ठेऊन दहा वर्षांपासून ओळख असलेल्या मुलीसोबत लातूर जिल्यातीलरायवाडी येथील मंदिरात लग्न केले त्याच मुलीसोबत लग्न करण्याचे निश्चित असताना हि संदीप ने माझ्या मुलीसोबत विवाह करतो म्हणून सात लाख रुपये घेऊन फसवणूक केले असा आरोप मुलीच्या वडिलांनी केला आहे .

## धक्कादायक! ठाण्यात लसीशिवाय लसीकरण प्रमाणपत्र?




ठाणे महापालिकेच्या लसीकरण केंद्रावर चौकशीसाठी गेलेल्या ज्येष्ठ नागरिकास लस देण्यात आलेली नसतानाही घरी आल्यानंतर त्याच्या मोबाइलवर लसीकरण झाल्याचा मेसेज आणि लसीकरण प्रमाणपत्र तयार झाल्याचा धक्कादायक प्रकार घडला आहे. या प्रकरणानंतर या ज्येष्ठ नागरिकांनी मुलाच्या मदतीने ठाणे महापालिकेकडे तक्रार केली आहे. सुधाकर रत्नाकर असे या ज्येष्ठ नागरिकाचे नाव असून लसीकरणाच्या चौकशीसाठी गेले असताना त्यांच्याकडून आधारकार्डची मागणी करून त्यांना लसीकरणासाठी आग्रह करण्यात आला. परंतु, लसीकरणाला नकार दिल्यानंतरही त्यांचे लसीकरण झाल्याचे प्रमाणपत्र आल्यानंतर मात्र त्यांनी महापालिकेकडे तक्रार केली आहे. ठाण्यातील सावरकरनगर येथे राहणारे सुधाकर रत्नाकर यांचे वय ६४ असून ते ठाणे महापालिकेच्या टेंभी नाका येथील वाडीया रुग्णालयात लसीकरणाच्या चौकशीसाठी गेले होते. रुग्णालयात कोणती लस देत असल्याची चौकशी त्यांनी केल्यानंतर त्यांना डॉक्टरांनी आधारकार्ड आणि पॅनकार्ड आणले आहे का? अशी विचारणा केली. त्यावर त्यांनी मोबाइलमध्ये असलेला फोटो त्यांना दाखवला. त्यानंतर डॉक्टरांनी त्यांना केंद्रामध्ये जाऊन लस घेण्यास सांगितले. त्यांनी लस घेण्यास नकार दिल्याने त्यांना ५०० रुपये दंड केला जाईल, अशी भीती घालण्यात आली. परंतु त्यांनंतरही तेथील डॉक्टरांनी लस घेण्याचा आग्रह केल्याचा दावा सुधाकर यांनी केला आहे. सुधाकर यांनी तेथून घरी परतण्याचा निर्णय घेतला. परंतु, संध्याकाळी त्यांच्या मोबाइलवर लसीकरण झाल्याचा मेसेज आला. तसेच त्यांचे प्रमाणपत्रही तयार झाले.

## कामाचा ताण असह्य झाला; फायनान्स कंपनीच्या मॅनेजरची आत्महत्या



जळगाव शहरातील फायनान्स कंपनीत क्रेडीट मॅनेजर म्हणून कार्यरत असलेल्या व्यक्तीने आज सोमवारी सकाळी ६.३० वाजेपूर्वी कामाच्या तणावातून राहत्या घरात गळफास घेवून आत्महत्या केल्याची खळबळजनक घटना समोर आली आहे. प्रदीप धनलाल शिंपी (कापुरे, वय ४५, रा. मयुर कॉलनी) असे मृत मॅनेजरचे नाव आहे. आत्महत्येपूर्वी लिहलेल्या तिन पानांच्या चिठ्ठीत त्यांनी कामाचा ताण जास्त झाल्याने आत्महत्या करीत असल्याचे म्हटले आहे. दरम्यान, त्यांच्यावर कामाचा ताण टाकून छळ करणाऱ्या कंपनीतील अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्याची मागणी मृताच्या कुटुंबियांनी केली आहे. जळगावातील मुथ्थूट होमफिन इंडीया लिमीटेड या फायनान्स कंपनीत मृत प्रदिप शिंपी १ नोव्हेंबर २०१७ पासून क्रेडीट मॅनेजर म्हणून कार्यरत होते. जळगावसह औरंगाबाद, धुळे व शिरपुर विभागाची जबाबदारी होती. काल रविवारी (२० जून ) कुटुंबीयांसह एका कार्याक्रमासाठी नातेवाईकांकडे गेले होते. रात्री उशिरा घरी आल्यानंतर ते एकटेच बाहेरच्या हॉलमध्ये झोपले होते. त्यांच्या पत्नी व दोन्ही मुले मागच्या खोलीत झोपलेले होते. रात्रीतून त्यांनी गळफास घेऊन आत्महत्या केली. सकाळी ६.३० वाजता ही घटना उघडकीस आली. यावेळी त्यांच्या पत्नी सुचिता यांना जबर धक्का बसला. शिंपी यांनी तीन पानांची सुसाईट नोट लिहीली आहे. यात त्यांनी कामाचा ताण, अतिरीक्त दबाव असल्याचा उल्लेख केला आहे. कमी मनुष्यबळात खुप काम करावे लागते आहे, यातच अतिरीक्त काम देऊनही वेळेत पुर्ण करण्यासाठी दबाव टाकला जातो. नोकरी जाण्याची भिती वाटते, असे त्यांनी म्हटले आहे. कंपनीतील इतर सहकारी, अधिकारी, कंपनी मालकांनी माझ्या नंतर कुटंुबीयांना मदत करा.

# पावसाळी पिकनिक जिवावर बेतली

## वेगवेगळ्या अपघातांमध्ये तीन बुडाले

ठाणे: पावसाळयाचा मनमुराद आनंद घेण्यासाठी गेलेल्या तरूणांचा बुडून मृत्यू झाल्याच्या तीन घटना रविवारी ठाणे शहरात घडल्या आहेत. येऊरच्या नील तलाव परिसरात दिवसभरात दोन जणांचा बुडून मृत्यू झाल्याने खळबळ उडाली आहे. सकाळी एक मृतदेह बाहेर काढून परतलेल्या आपत्ती व्यवस्थापन पथकांना दुपारनंतर दुसऱ्या तरुणासाठी प्रदीर्घ शोधकार्य मोहिम राबवावी लागली. तर तिसरी घटना लोकमान्यनगर येथील मिलेट्री ग्राऊंड येथील एका डबक्यात पोहण्यासाठी गेलेला तरूण चिखलात रूतून मृत्यूमुखी पडला. त्यामुळे रविवारच्या दिवसभरातील अवघ्या १२ तासांमध्ये तीन जणांचा दुदैवी मृत्यू झाल्याने हळहळ व्यक्त होत आहे.

येऊरमधील पटोणापाडा येथील नील तलावामध्ये सकाळी ७ वाजता गेलेल्या सहा मित्रांपैकी प्रसाद पावसकर (१६) याचा सकाळी साडे आठ वाजण्याच्या सुमारास मृत्यू झाला. तलावातील पाण्याचा अंदाज नसताना पाण्यात उडी घेतल्याने तलावातील दगडावर आपटून प्रसादला मार लागला. त्याच्या मित्रांनी त्याला बाहेर काढले परंतु चक्कर आल्याने तो पुन्हा पाण्यात पडला आणि दगडांमध्ये अडकल्याने पाण्यात बुडून त्याचा मृत्यू झाला. आपत्ती व्यवस्थापन पथकानं घटनास्थळी पोहचून त्यांनी दुपारी ११ वाजता प्रसाद याचा मृतदेह बाहेर काढला. त्यानंतर बचाव पथके परतल्यानंतर ठाण्यातील राबोडी येथील पाच तरुणांचा दुसरा गट दुपारी २.३० वाजण्याच्या सुमारास त्याच ठिकाणी पोहण्यासाठी गेला होता. त्यापैकी जुबेर सय्यद व अब्दुल हन्नर या दोघांनी पाण्यात उडी मारली. परंतु पाण्याचा अंदाज न आल्याने ते दोघेही पाण्यात बुडाले. इतर मित्रांनी यापैकी अब्दुल हन्नन याला





पाण्यातून बाहेर काढल्याने तो वाचला. परंतु जुबेर सय्यद (२०) हा खोल पाण्यात बुडाल्याने त्याचा मृत्यू झाला.आपत्ती व्यवस्थापन विभागाकडून सायंकाळी साडे सहा वाजेपर्यंत खोल पाण्यात शोध मोहिम राबवून जुबेर याचा मृतदेह बाहेर काढला. खोल पाण्यामध्ये शोध कार्यासाठी अत्याधुनिक कॅमेऱ्यांची मदत घेण्याची वेळ आपत्ती व्यवस्थापन पथकांवर आली होती. अत्यंत धोकादायक परिसर असल्याने या भागात शोध कार्यात अनेक अडचणींचा सामना पथकांना करावा लागला. तर सायंकाळी ४ वाजण्याच्या सुमारास लोकमान्यनगर येथील मिलेट्री ग्राऊंड परिसरातील मोठ्या डबक्यामध्ये पोहण्यासाठी गेलेल्या सुतेश करावडे (३३) या तरूणाचा चिखलात पाय रुतल्याने पाण्यात बुडून मृत्यू झाला. सुतेश हा लोकमान्यनगर पाडा नंबर ४ येथील राहणारा आहे. आपत्ती व्यवस्थापन कक्ष, अग्निशमन दलानी तिनही मृत्यदेह बाहेर काढून रुग्णालयात पाठवले.

## एसटी कर्मचाऱ्यांसाठी काँग्रेस आक्रमक



राज्य परिवहन (एसटी) महामंडळातून निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना रजेचे व वेतनवाढ फरकाचे पैसे अद्याप मिळालेले नाहीत. या कर्मचाऱ्यांना हे आर्थिक लाभ मिळवून देण्यासाठी मुंबई काँग्रेसने पुढाकार घेतला आहे. यासाठी उपमुख्यमंत्र्यांना एक पत्रही देण्यात आले असून या मुद्द्यावरून शिवसेना आणि काँग्रेस समोरासमोर येण्याची शक्यता आहे.

जून २०१८ पासून निवृत्त झालेल्या एसटीच्या ७,५०० कर्मचारी व अधिकाऱ्यांना निवृत्तीनंतरचे आर्थिक लाभ मिळालेले नाही. सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची सुमारे २०० कोटी रुपयांची देणी थकीत असून अनेक कर्मचारी आपल्या हक्काचे पैसे मिळविण्यासाठी एसटी महामंडळाच्या विभागीय कार्यालयात ३ वर्षांपासून फेऱ्या मारत आहेत. मात्र महामंडळाकडून त्यांना दिलासा मिळालेला नाही.युती आणि महाविकास आघाडी या दोन्ही सरकारांच्या काळात एसटी महामंडळ हे शिवसेनेकडेच आहे. सध्या मुख्यमंत्रीदेखील शिवसेनेचा आहे. असे असताना एसटी कर्मचाऱ्यांची आर्थिक गैरसोय होत आहे. एसटी कर्मचाऱ्यांना ही देणी मिळावीत यासाठी मुंबई काँग्रेसचे अध्यक्ष भाई जगताप यांनी उपमुख्यमंत्र्यांना पत्र पाठवले असून तातडीने हा प्रश्न सोडवण्यासाठी आर्थिक तरतूद करावी, असे या पत्रात म्हटले आहे. गेल्या चार वर्षांपासून पैशांची चणचण असल्याने पैसे मिळविण्यासाठी निवृत्त एसटी कर्मचाऱ्यांना विभागीय कार्यालयात चकरा माराव्या लागत आहे.

## प्रत्येक जिल्ह्यात आंदोलन करण्याची आम्हाला हौस नाही- संभाजीराजे

नाशिक: 'प्रत्येक जिल्ह्यात आंदोलन करण्याची आम्हाला हौस नाही. राज्य सरकारनं त्यांच्या हातातील गोष्टी मार्गी लावाव्यात एवढं आमचं म्हणणं आहे,' असं खासदार

मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर संभाजीराजे यांच्या नेतृत्वाखाली आज नाशिकमध्ये मूक आंदोलन करण्यात आलं. जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींनी यावेळी मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर आपली भूमिका मांडली. त्यानंतर संभाजीराजे यांनी पत्रकारांशी संवाद साधला. समाजाला न्याय देण्यासाठी आलेल्या सर्वपक्षीय नेत्यांचं त्यांनी स्वागत केलं. 'छत्रपती शिवाजी महाराज, शाहू महाराज यांनी वंचितांना मुख्य प्रवाहात आणलं. आज मराठा समाज वंचित झालाय. काय चूक



आहे मराठा समाजाची?,' असा प्रश्न संभाजीराजेंनी उपस्थित केला.

'आपल्या भावना व्यक्त करण्यासाठी मराठा समाजानं ५८ मोर्चे काढले. आता पुन्हा आंदोलन सुरू आहे. प्रत्येक जिल्ह्यात आंदोलन करण्याची आम्हाला हौस नाही. राज्य सरकारनं हातातील गोष्टी मार्गी लावाव्यात अशी आमची मागणी आहे. रिव्ह्यू पिटीशन, क्युरेटिव्ह पिटीशन, ३३८ ब, केंद्र, राष्ट्रपती यांच्याकडं पाठपुरावा करण्यासारखे काही पर्याय आहेत. वातावरण गढूळ करायला दोन मिनिटं लागतात. मात्र, समाजाला दिशा देणं ही छत्रपती घराण्याची जबाबदारी आहे.

## कामावरुन काढल्याचा राग; त्यानं थेट ऑफिस पेटविले, कंपनीच्या गाड्याही फोडल्या

ट्रान्सपोर्ट कंपनीने कामावरून काढून टाकल्याच्या रागातून एका ट्रकचालकाने चांगलीच दहशत निर्माण केली. ज्या सिमेंट कंपनीच्या तक्रारीवरून त्याला काढून टाकण्यात आले, त्या कंपनीचे केडगावमधील कार्यालय पेटवून देण्याचा प्रयत्न केला. तर ज्या ट्रान्सपोर्ट कंपनीने कामावून काढून टाकले, त्यांच्या गाड्या रस्त्यावर अडवून, काचा फोडून चालकांना दमबाजी केली. शेवटी पोलिसांनी त्याला अटक केली.

भिमा सर्जेराव सकट (वय ३२ वर्षे रा. स्टेशन रोड, अहमदनगर) असे त्या आरोपी ट्रकचालकाचे नाव आहे. तो येथील रघुजी ट्रान्सपोर्टमध्ये ट्रकचालक म्हणून नोकरीला होता. तक्रार आल्याने त्याला कंपनीने कामावरून काढून टाकले. या रागातून त्याने संबंधितांवर हल्ले केले. याप्रकरणी त्याच्याविरूद्ध दोन गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. एसीसी सिमेंट कंपनीच्या केडगावमधील कार्यालयाचे व्यवस्थापक मल्लीनाथ हनुमंत बोगले यांनी कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांनी म्हटले की, १५ जून रोजी सायंकाळी साडेपाचच्या सुमारास ट्रकचालक भिमा सकट कार्यालयात आला. तुमच्या कंपनीच्या सांगण्यावरूनच मला माझ्या कंपनीने कामावरून काढून टाकले, असे म्हणत धक्काबुक्की केली, सत्तूरचा धाक दाखविला. रात्री नऊच्या सुमारास तो पुन्हा आला. ऑफीसच्या खिडकीची काच फोडून ज्वलनशील पदार्थ आतमध्ये टाकला आणि आग लावून दिली. यामध्ये कंपनीचे नुकसान झाले. या फिर्यादीवरून



कोतवाली पोलिसांनी गुन्हा दाखल केला. दुसरी फिर्याद सोमनाथ अभिमन्यू लोखंडे (ट्रक चालक) यांनी नगर तालुका पोलिस ठाण्यात दिली आहे. त्यांनी म्हटले आहे की, १७ जून रोजी मी ट्रकमध्ये माल भरून ती घेऊन जात होतो.

पृष्ठ १ वरुन

### शिवसेनेचा भाजपच्या बालेकिल्ल्यावर सर्जिकल स्ट्राईक

आमचा प्रयत्न असून नक्कीच हिंगणघाट नगर परिषदेमध्ये बदल घडवून आणू, असा विश्वास व्यक्त केला आहे. काही दिवसांपूर्वी जळगावमध्ये सुद्धा शिवसेनेनं भाजपला मोठा दणका दिला होता. जळगाव महापालिका (Jalgaon municipal corporation) महापौर निवडणुकीत भाजपचे 27 नगरसेवक (BJP Corporator) सेनेत खेचून आणले होते. त्यामुळे जळगाव महापालिकेत सेनेचा भगवा फडकला होता.

### मोबाइल गेम्ससाठी वापरले आईच्या

त्यामध्ये हा प्रकार समोर आला. त्या मुलाने सांगितले, की 'तो ऑनलाईन मोबाइल गेम खेळत होता. मोबाइल गेम खेळण्यासाठी तो आईच्या बँक खात्यातून पैसे टाकत होता.' एके दिवशी आईने बँकेत जाऊन खात्यावरील नोंदी पासबुकवर घेतल्या. त्यात तिच्या खात्यातून शंभर रुपये, २१ रुपये, २०० रुपये याशिवाय छोटी रकमा युरोनेट खात्यावर जात असल्याचे दिसले. हे पैसे मुलगाच गेमसाठी वापर असल्यामुळे आई त्याच्यावर रागवली. या रागातून तो घरातून निघून गेला. आता पोलिसांनी त्याला कुटुंबाच्या ताब्यात दिले आहे. मोबाइल गेम्स ठरतोय धोकादायक - सध्या तरूण आणि अल्पवयीन मुले मोठ्या प्रमाणात मोबाइलवर गेम्स खेळत आहेत. या मोबाईल गेम्स किंवा व्हिडीओ सर्फिंगमुळे अनेक बालकांच्या मनावर परिणाम होत आहे.

- पालकांनी आपली मुलं किती वेळ मोबाईल खेळतात, याकडे लक्ष ठेवायला हवे.
- मोबाइल गेम्सच्या धोक्यातून मुलांना सावरण्यासाठी पालकांनी लक्ष देण्याची गरज आहे.

### काकांच्या अंत्यविधीसाठी येणं

हाती लागले नाही. या दरम्यान कल्याणमध्ये राहणारा अरबाज शेख हा तरुणदेखील याच वेळी अचानक बेपत्ता झाला होता. तो बेपत्ता झाल्याची तक्रार त्याच्या नातेवाईकांनी कल्याण बाजारपेठ पोलिस ठाण्यात केली. या दोघांना मनमाड आणि बाजारपेठचे पोलिस शोधत होते. दोन दिवसापूर्वीच कल्याण पश्चीमेतील रोहिदास वाडा येथे एका व्यक्तिचा मृत्यू झाला ती मृत व्यक्ती बेपत्ता असलेल्या अरबाज याचा काका होता. काका मृत्यूची बातमी कळताच अरबाज घरी आला. त्याच्यासोबत सना नावाची त्याची पत्नी होती. ही गुप्त माहिती मिळताच बाजारपेठचे पोलिस त्याठिकाणी पोहचले आणि त्यांनी अरबाजला ताब्यात घेतले. जेव्हा पोलिसांनी अरबाज सोबत असलेल्या पत्नीविषयी विचारणा केली असता सना म्हणून त्याच्या सोबत असलेली त्याची पत्नी ही बेपत्ता झालेली सिमा आहे. जी मनमाडहून 2017 साली बेपत्ता होती. हे दोघे लग्न करुन कोन गाव परिसरात राहत होते. प्रेम प्रकरणातून लग्न करुन हे दोघे पसार झाले. दरम्यान या सगळयामुळे पोलिस देखील चक्रावून गेले. दरम्यान अरबाज आणि सीमा यांनी लग्न केले असून त्यासंदर्भात कोणाची काही तक्रार प्राप्त झाली नसल्याची माहिती पोलीस अधिकारी सुनिल पवार यांनी दिली.

### महाविकास आघाडीचा 'तो'

गेल्या अठरा महिन्यात महा विकास आघाडी कशी भक्कम होईल यासाठीच आम्ही प्रयत्न केले. त्यामुळे आमच्यात मतभेद नाहीत. हे सरकार अस्थिर करण्याचा प्रयत्न भाजपने करू नये, अजून पस्तीस वर्षे हे सरकार टिकेल. सरकार अस्थिर होत नाही हे लक्षात आल्यामुळेच केंद्र सरकारने आमच्या मागे चौकशीचा ससेमिरा लावण्याचा आरोपीही मुश्रीफ यांनी केला. भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील हे सत्ता नसल्यामुळे अस्वस्थ झाले आहेत, कधी एकदा सत्तेत जाऊन बसू असं त्यांना वाटत आहे. त्यामुळेच त्यांची विविध मार्गाने धडपड सुरू आहे असा टोला मारताना मुश्रीफ म्हणाले , मुख्यमंत्री शिवसेनेचे आहेत. त्यामुळे शिवसेनेच्या आमदारांची कामे होत नाहीत असा आरोप करणे चुकीचे आहे. उलट त्यांच्या आमदाराची दुप्पट कामे झाली तर आमची काही अडचण नाही.

### अजित पवारांच्या कार्यक्रमात

या कार्यक्रमास कार्यकर्त्यांनी मोठी गर्दी केली होती. डेंगळे पुलावर कार्यकर्ते, पदाधिकाऱ्यांनी गाड्या लावल्या होत्या. त्यामुळे या भागातील वाहतूकही विस्कळित झाली होती, असे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे शहराध्यक्ष महेश हांडे यांनी शिवाजीनगर पोलिस ठाण्यात या कार्यक्रमासाठी परवानगीसाठी अर्ज दाखल केला होता. हांडे यांनी या अर्जात करोना संसर्ग असल्याने प्रशासनाने दिलेल्या नियमावलीचे पालन केले जाईल, तसेच या कार्यक्रमास १०० ते १५० जण उपस्थित राहतील, असे अर्जात म्हटले होते. प्रत्यक्षात मात्र कार्यक्रमस्थळी ४०० ते ५०० कार्यकर्त्यांनी गर्दी केली होती. काही कार्यकर्त्यांनी मास्कही घातलेले नव्हते. उद्घाटन सोहळयास झालेल्या गर्दीमुळे पोलिसांनी शनिवारी कारवाईचे संकेत दिले होते. याप्रकरणी पोलिसांचा आदेश न पाळणे, राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५, महाराष्ट्र कोव्हिड उपाययोजना २०२० या कायद्यातील कलमांन्वये गुन्हा दाखल केला आहे.

## मुंबईत 'डेल्टा प्लस व्हेरिएंट'चा एकही रुग्ण नाही

मुंबईत कोरोना 'डेल्टा प्लस व्हेरिएंट' चा एकही रुग्ण सध्या तरी आढळून आलेला नाही. मात्र एमएमआर क्षेत्रात कोरोना डेल्टा या नव्या स्ट्रेनचा प्रसार होत असल्याचे म्हटले जात असले तरी ते सिध्द झालेले नाही. मात्र खबरदारी म्हणून मुंबईमधून दररोज ५० नमुने पुणे येथील प्रयोग शाळेत तपासणीसाठी पाठवले जात आहेत ; मात्र सदर अहवालात डेल्टा प्लस या नवीन स्ट्रेनचा रुग्ण सापडेला नाही. यासंदर्भातील माहिती अतिरिक्त आयुक्त सुरेश काकाणी यांनी दिली आहे. तसेच, नागरिकांनी काळजी करू नये व घाबरून जाऊ नये. कोरोनाची लक्षणे दिसल्यास तात्काळ नजीकच्या रुग्णालयात वैद्यकीय तपासणी करून घ्यावी, असे आवाहनही त्यांनी नागरिकांना केले आहे.

## मुंबईत आढळले स्वाईन फ्ल्यूचे 2 रुग्ण, पालिका यंत्रणा सज्ज

मुंबईत सध्या कोरोनाचा प्रादुर्भाव असताना 'स्वाईन फ्ल्यू' चे २ रुग्ण आढळून आले असून त्यांच्यावर यशस्वी उपचार केल्याने ते बरे होऊन घरी परतले आहेत;

मात्र गेल्या वर्षी जूनपर्यंत स्वाईन फ्लूचे ५ रुग्ण आढळून आले होते. त्यामुळे तुलनात्मक पाहता गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा रुग्णसंख्येत ५० टक्के घट झाली आहे. यासंदर्भातील माहिती अतिरिक्त आयुक्त सुरेश काकाणी यांनी दिली आहे. मात्र 'स्वाईन फ्ल्यू' चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी पालिका आरोग्य यंत्रणा सुसज्ज ठेवण्यात आली आहे,

असेही त्यांनी सांगितले.

मुंबईत दरवर्षी पावसाळयाच्या कालावधीत स्वाईन फ्ल्यूचे काही रुग्ण आढळून येतात. मात्र स्वाईन फ्ल्यूचा अधिक प्रादुर्भाव वाढू नये यासाठी पालिका आरोग्य यंत्रणा सतर्क असून २४ तास यंत्रणा सुसज्ज ठेवण्यात आली आहे.




तसेच, स्वाईन फ्ल्यूच्या रुग्णांसाठी आवश्यक ठरणारी सर्व औषधे पालिका रुग्णालयात उपलब्ध करण्यात आली आहेत. त्यामुळे नागरिकांनी भिती बाळगू नये, असे आवाहन अतिरिक्त आयुक्त सुरेश काकाणी यांनी केले आहे.

संपादकीय...



# नियती स्वीकारलेला ॲथलिटोत्तम..

आयुष्याच्या ऐन उमेदीत लघू अंतराच्या वेगवान शर्यतींमध्ये हुन्नर दाखवलेले मिल्खा सिंग आयुष्यात दीर्घ पल्ल्याची मॅरेथॉन धावले. जीवनावर उत्कट प्रेम आणि त्याला शिस्तीची जोड या भांडवलावर त्यांनी आयुष्याचे शतक सहज पूर्ण केले असते. पण संपूर्ण जगाच्या परिचालनातच खोडा घालणारा करोना विषाणू प्रकटला आणि त्याच्यासमोर मिल्खा सिंग यांच्यासारख्या लढवय्यालाही शरण जावे लागले. खुद्द मिल्खा सिंग आज जेथे असतील, तेथेही याविषयी त्यांच्यात अजिबात कटुता नसेल. प्राक्तन किंवा डेस्टिनी या संकल्पनेवर त्यांची विलक्षण श्रद्धा अखेपर्यंत राहिली. फाळणीच्या भयंकर जखमा त्यांच्या दृष्टीने कधीही वाळल्या नसतील; फाळणीपश्चात हिंसाचारात आईवडील आणि दोन भाऊ गमावल्यानंतर तशी अपेक्षाही नाही. पण ही वेदना त्यांनी कधी मिरवली नाही किंवा पाकिस्तानला वा दोन्ही बाजूंकडील नेत्यांना शिव्याशाप देऊन ती जिरवण्याचाही प्रयत्न त्यांनी केला नाही. कित्येक मरण पावले या बाजूचे आणि त्या बाजूचेही. हा सगळा नियतीचा खेळ, असेच मिल्खा सिंग मानून चालले. बऱ्याचदा असे



करणाऱ्यांमध्ये एक प्रकारची पराभूत आणि स्वीकारू मानसिकता पाहिली जाते. मिल्खा सिंग यांच्याबाबतीत तशी गल्लत संभवली नाही, कारण त्यांच्या आयुष्याचा पट संघर्षांत गेला. त्यात अनेक दु:खाचे क्षण आले, तसे अत्यानंदाचे, अभिमानाचेही येऊन गेलेत. संघर्षांसमोर, आव्हानांसमोर त्यांनी हार मानली नाही. पण त्याहीपलीकडे एक अवस्था असते, संवेदनशील स्थितप्रज्ञतेची. ती अंगी भिनल्यामुळेच विजयाचा कैफ आणि पराजयाचा विषाद त्यांना व्यक्त करावासा वाटला नाही.

मिल्खा सिंग धावपटू किंवा ॲथलीट बनले, ते पूर्णतया परिस्थितीच्या रेटय़ामुळे. फाळणीच्या रक्तलांच्छित हिंसाचारापेक्षाही विलक्षण गरिबी आणि रोगराईपायी त्यांनी अधिक भावंडे गमावली. फाळणीमुळे कुटुंबीयांशी झालेली ताटातूट, मग पालकांची हत्या हा तर निव्वळ एक टप्पा होता. दु:ख करायला उसंत नव्हती. भारतात पळून आल्यावर लहान-मोठी कामे करून, काही वेळा चोरी करून पोटासाठी अन्नार्जन करणे यालाच प्राधान्य होते. त्यांच्या बंधूमुळे थोडेफार स्थैर्य मिळाले. तीन प्रयत्नांनंतर लष्करात नोकरी मिळाली आणि त्यांच्यातील नैसर्गिक धावपटूला दिशाही. मिल्खा सिंग सुसाट पळायचे. भारतीय लष्करात खेळांना मिळणाऱ्या प्रोत्साहनामुळे ४०० मीटर्स, २०० मीटर्स, ४४० यार्ड अशा शर्यतींमध्ये ते उतरू लागले. लष्करातील आंतरविभागीय क्रीडास्पर्धामध्ये त्यांची धाव बिनतोड असायची. शर्यतीच्या ट्रॅकवर अंतिम टप्प्यात काही वेळा उलट फिरून प्रतिस्पध्र्याकडे पाहात ते शर्यत पूर्ण करायचे! पुढे राष्ट्रीय स्तरावर निवड झाल्यानंतर आंतरराष्ट्रीय स्पर्धामध्ये भारताचे प्रतिनिधित्व करण्याची संधी त्यांना मिळू लागली. १९५६ च्या मेलबर्न ऑलिम्पिकमध्ये त्यांनी निराशा केली. पण त्या स्पर्धेत ४०० मीटर्सच्या विजेत्याकडून ॲथलेटिक्स प्रशिक्षणाविषयी कानमंत्र मिळाल्यानंतर त्यांनी प्रचंड मेहनतीला शास्त्रशुद्ध प्रशिक्षणाची जोड दिली. १९५८ च्या आशियाई स्पर्धामध्ये त्यांनी ४०० मीटर्समध्ये सुवर्णपदक जिंकलेच, शिवाय विख्यात पाकिस्तानी धावपटू अब्दुल खलिकला २०० मीटर्समध्येही हरवून दाखवले. याच खलिकला पुन्हा एकदा लाहोरमध्ये त्याच प्रकारात हरवून मिल्खा सिंग यांनी आशियातील त्यावेळच्या सर्वात वेगवान समजल्या जाणाऱ्या धावपटूवर निर्विवाद वर्चस्व गाजवून दाखवले होते. त्यावेळचे पाकिस्तानी शासक जनरल आयुब खान यांनी त्यांना 'फ्लाइंग सिख' हे बिरुद त्या शर्यतीनंतरच बहाल केले होते.

रोम ऑलिम्पिकमध्ये मिल्खा सिंग यांचे कांस्यपदक ०.१ शतांश सेकंदांनी हुकले. शर्यतीच्या अर्ध्या टप्प्यावर आपण गाफील राहिलो आणि त्याची किंमत आपल्याला मोजावी लागली, असे ते सांगत. पण त्या वेळी त्यांनी नोंदवलेली वेळ राष्ट्रीय विक्रम ठरला होता आणि जवळपास ३८ वर्षे तो अबाधित राहिला होता. अब्दुल खलिक किंवा कोणत्याही प्रतिस्पध्र्याविषयी त्यांची मित्रत्व आणि नम्रतेचीच भावना राहिली. फाळणीच्या जखमा आणि अपेक्षांचे ओझे घेऊन, प्रस्थापित जगताच्या अवहेलना वागवत हळूहळू उभ्या राहू लागलेल्या भारताचे प्रतिनिधित्व मिल्खा करतात. १९६० मध्ये ऑलिम्पिक पदकाच्या समीप पोहोचण्याच्या आठ वर्षे आधी स्वतंत्र भारताचे पहिले पदक मराठमोळे कुस्तिगीर खाशाबा जाधव यांनी जिंकले होते. दुर्दैवाने खाशाबांना पुढील आयुष्यात मिल्खा यांच्यासारखी प्रसिद्धी मिळाली नाही. पुढे कित्येक वर्षे वैयक्तिक ऑलिम्पिक पदक भारतासाठी दुर्मीळ बनले होते. या पार्श्वभूमीवर खाशाबांचे पदक किंवा मिल्खा सिंग वा पी. टी. उषा यांचे थोडक्यासाठी पदक निसटणे याच हॉकीपलीकडे भारतीय क्रिकेटेतर क्रीडाक्षेत्राच्या सुवर्णगाथा होत्या.

# १९५ दिवसांनंतर..

आपले वचन पूर्ण करण्यासाठी केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारच्या हाती आजपासून, म्हणजे २१ जूनपासून, फक्त १९५ इतके दिवस आहेत. हे वचन आहे देशातील सर्व पात्र नागरिकांच्या लसीकरणाचे. या संदर्भात सर्वोच्च न्यायालयाचा रेटा जाणवू लागल्यानंतर केंद्र सरकारने ते गेल्या आठवडय़ात दिले. त्यानुसार वर्षअखेपर्यंत देशातील सर्व पात्र नागरिकांचे लसीकरण केंद्र सरकार करू इच्छिते. हे लसीकरण आश्वासन कोणत्याही निवडणूक प्रचार सभेत दिले गेलेले नाही आणि ते अशा कोणत्याही जाहीरनाम्याचाही भाग नाही. म्हणजे 'हा तर चुनावी जुमला होता' असे सांगण्याची सोय केंद्रास निदान या आश्वासनाबाबत नाही. तेव्हा आज, २१ जूनपासून, अमलात येणाऱ्या केंद्र सरकारच्या ताज्या धोरणानुसार देशभर लसीकरणाचा नवा टप्पा सुरू होत असताना उपलब्ध लसकुप्या, नागरिक आणि हाती असलेला वेळ यांचे त्रराशिक मांडणे आवश्यक ठरते.

त्याचे महत्त्व समजून घेण्यासाठी आपल्या लसीकरण मोहिमेचा आकार लक्षात घ्यावा लागेल. त्यानुसार ३१ डिसेंबपर्यंत देशातील किमान ८६ कोटी ५० लाख नागरिकांच्या देहांत लसीकरणाची सुई शिरणे आवश्यक. या इतक्या नागरिकांस लशीच्या किमान दोन मात्रा द्याव्या लागतील. कारण अद्याप तरी एकमात्री लस आपल्याकडे विकसित झालेली नाही आणि जेथे विकसित झाली तेथून ती भारतीय बाजारात आलेली नाही. म्हणजे इतक्या नागरिकांस १७३ कोटी इतक्या लसमात्रा लागतील. त्यातून दहा कोटी मात्रा वगळायच्या. कारण देशातील पाच कोटी नागरिकांचे लसीकरण पूर्ण झाले आहे. उर्वरितांतील १७-१८ कोटी नागरिकांस ताज्या आकडेवारीनुसार लशीची एक मात्रा मिळालेली आहे. याचा अर्थ राहिलेल्या नागरिकांस सुमारे १४५ कोटी वा तत्सम लसमात्रा सरकारला उर्वरित १९५ दिवसांत टोचाव्या लागतील. त्यासाठी केंद्र सरकारला दैनंदिन लसीकरणाचा वेग सरासरी ७४ लाख इतका वाढवावा लागेल.

सध्या तो दिवसाला जास्तीत जास्त ३० लाख इतका आहे. तोदेखील जून महिन्यापासून. त्याआधी करोनाची दुसरी लाट शिगेस गेलेली असताना दैनंदिन लसीकरण जेमतेम १५-१६ लाखांवर आले होते. सध्या ही परिस्थिती काही प्रमाणात निश्चित सुधारली असे म्हणता येईल. पण ती इतकीही सुधारलेली नाही की केंद्र सरकारच्या शब्दावर निश्चिंत राहता येईल. तेव्हा सद्य:स्थितीत हा सध्याचा वाढलेला वेग जरी लक्षात घेतला तर ३१ डिसेंबपर्यंत जेमतेम ५८ कोटी ५० लाख लसमात्रा टोचल्या जातील. म्हणजेच हा वाढलेला ३० लाख मात्रा/प्रतिदिन हा वेग लक्ष्यपूर्तीसाठी अजिबात पुरेसा नाही. तो तसाच राहिला तर संपूर्ण भारतवर्षांच्या लसीकरणासाठी किमान ४५० दिवस लागतील. म्हणजेच २०२२ सालचे पुढील आठ महिने, ऑगस्टपर्यंत, आपल्याकडे लसीकरणच सुरू असेल. याचा साधा अर्थ असा की, वर्षअखेपर्यंतचे लक्ष्य गाठावयाचे तर लसीकरणाचा वेग आपणास वाढवावा लागेल.

लशींची उपलब्धता लक्षात घेता, हा वेग जास्तीत जास्त दुप्पट होऊ शकेल. वेग, उत्पादन, अर्थविकास आदींची गती वाढवण्याची चर्चा नेहमी होते. त्यात वारेमाप आश्वासने दिली जातात. अर्थसाक्षरता बेतास बात असलेल्या आपल्या समाजात त्यावर विश्वासही ठेवला जातो. पण वास्तव तसे नसते. म्हणजे उदाहरणार्थ १० टक्क्यांची गती वाढून वाढून एकदम दहापट वाढू शकत नाही. हा मुद्दा अधिक स्पष्ट करण्यासाठी सोपे उदाहरण म्हणजे, वर्षभर प्रत्येक चाचणीत जेमतेम ४०-५० टक्के मिळवणारा अंतिम परीक्षेत पैकीच्या पैकी गुण मिळवू शकत नाही. गणिती गतीनुसार असे होत नाही. त्यामुळे कमाल आशावादी विचार करून आपला लसीकरणाचा वेग सध्याच्या दुप्पट होईल असे गृहीत धरले तरी सर्व पात्र देशवासीयांस लसमात्रा देण्यासाठी साधारण २३० दिवस लागू शकतात. म्हणजे पुढील वर्षांचा फेब्रुवारी उजाडणार. तरीही अर्थ तोच. वर्षअखेरीपर्यंत संपूर्ण देशवासीयांचे लसीकरण अशक्य नाही तरी दुष्प्राप्य.

या अवस्थेमागील महत्त्वाचे कारण म्हणजे कितीही तावातावाने शब्दसेवा केली तरीही सत्य हे आहे की, आपल्याकडे अजूनही फक्त दोनच लशी आहेत. इंग्लंडातील ऑक्सफर्ड-ॲस्ट्राझेनेकाने विकसित केलेली व सीरम इन्स्टिटय़ूटने बनवलेली 'कोव्हिशिल्ड' आणि हैदराबादच्या 'भारत बायोटेक'ची 'कोव्हॅक्सिन'. मध्यंतरी



रशियाच्या 'स्पुटनिक'च्या काही हजार कुप्या आल्या. पण त्यांचे टोचणे अद्यापही सुरू झालेले नाही. फायझर, जॉन्सन ॲण्ड जॉन्सन, मॉडर्ना आदी कंपन्यांच्या लशीही भारतीय बाजारात उंबरठय़ापर्यंत येऊन ठेपल्या आहेत, असे सांगितले जाते. पण पंचाईत अशी की, हे उंबरठय़ावरचे माप ओलांडून या लससुंदऱ्या भारतात पाऊल टाकण्यास काही तयार नाहीत. याचे कारण असे की, भारतीयांस टोचल्या गेल्यानंतर समजा काही दुष्परिणाम झाल्यास त्याची जबाबदारी कोणावर, हा प्रश्न आपल्या सरकारने अद्याप सोडवलेला नाही. हेदेखील खास भारतीय म्हणावे असे वैशिष्टय़. नुसतेच 'या' म्हणत आमंत्रण द्यायचे. पण आल्यावर करायचे काय, याचा विचारच नाही. त्यामुळे नुकसानभरपाईचा मुद्दा निकालात निघेपर्यंत या लशी भारतीय भूमीत पाय टाकण्यास तयार नाहीत.

तेव्हा आधी आपणास संभाव्य नुकसानभरपाईचे काय, या प्रश्नाचे उत्तर तयार ठेवावे लागेल. म्हणजे याबाबतही परदेशीयांचे अनुकरण आले. ज्या देशांत लशींचा सुकाळ आहे त्या.. म्हणजे अमेरिका, इंग्लंड, अन्य काही युरोपीय देश आदी.. देशांच्या सरकारांनी यासाठी स्वतंत्र निधी तयार केला. त्या त्या देशांतील या निधीचा उपयोग केवळ लसीकरणोत्तर (कोणावर झालेच तर) दुष्परिणाम, त्यानंतरची वैद्यकीय मदत आणि नुकसानभरपाई यासाठीच केला जाईल. इतक्या लहान लोकसंख्या असलेल्या इंग्लंड आदी देशांनी हा विचार आधीच केला आणि स्वतंत्र निधीची व्यवस्था केली. पण कशाबशा दोन लशी असताना 'सवासो करोड' देशवासीयांच्या लसीकरणाचे स्वप्न पाहणाऱ्या भारत सरकारकडे असा स्वतंत्र निधी नाही.

तो स्थापण्याच्या हालचाली सुरू असल्याचे वृत्त आहे. ते खरे ठरणार, त्याप्रमाणे निधी स्थापला जाणार, परदेशी लसनिर्मात्या कंपन्यांना आवश्यक ते नियमबदल केले जाणार आणि याची खातरजमा करून मग या नव्या लशी भारतात येणार. हे सर्व टाळून त्यांना तातडीने भारतप्रवेश द्यायची इच्छा असली तरीही या नुकसानभरपाईच्या कलमावर काही तोडगा काढावा लागेल. तो अद्याप तरी दृष्टिपथात नाही. आणि हे सर्व आपल्याला लसीकरणाची गती प्रचंड वाढवण्याची गरज असताना. या लसीकरणाबाबत आपल्या तोंडावर दूरचित्रवाणीच्या पडद्यावरून काहीही आकडे फेकले जातात. उदाहरणार्थ, आपण इतक्या अत्यल्प काळात १५ टक्के वा अधिक नागरिकांचे लसीकरण कसे पूर्ण केले इत्यादी. प्रत्यक्षात ते अर्धसत्य असते. म्हणजे १५ टक्क्यांस लस मिळालेली आहे हे खरे. पण फक्त पहिली मात्रा. लसीकरण 'पूर्ण' होण्यासाठी आणखी एक मात्रा लागेल. त्या अर्थाने दोन्ही मात्रा मिळून लसीकरण पूर्ण झालेल्यांचे प्रमाण आपल्याकडे जेमतेम ३.५ टक्के इतके आहे.

या साऱ्याचा अर्थ इतकाच की, आपल्याला लसीकरणाचा वेग प्रचंड प्रमाणात वाढवावा लागेल. एके काळी तर भारताने दिवसाला एक कोटी लसीकरणाचे लक्ष्य गाठण्याची भाषा केली. तथापि, त्याच्या जेमतेम एकचतुर्थांशापर्यंत आपली मजल गेली. ३१ डिसेंबरचे लक्ष्य गाठावयाचे असेल तर हे स्वप्नवत लक्ष्य प्रत्यक्षात आणावे लागेल. अन्यथा, १९५ दिवसांनंतर 'आणखी एक जुमला' हे स्पष्टीकरण आहेच.

## या जिल्ह्यातील बँकेत मोठा घोटाळा- 11 जणांवर गुन्हे दाखल; तिघांना अटक, इतर फरार



अकोला : अकोला जिल्ह्यातील हिवरखेड पोलिस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या आदिवासींना कर्ज वाटप प्रकरणात सेंट्रल बँकेच्या अडगाव शाखेत तत्कालीन अधिकारी आणि दलालांनी मिळून ३५ लाख रुपयांहून अधिक मोठा घोटाळा केल्याचं चौकशी अहवालात सिद्ध झालं आहे. या घटनेनं जिल्ह्यात एकच खळबळ उडाली आहे. अडगाव येथील सेंट्रल बँकेच्या शाखेत कर्जवाटपात बरेच गैरप्रकार झाल्याची ओरड अनेक महिन्यांपासून होत होती. यामध्ये अनेक आदिवासी बांधवांची पिळवणूक होत असल्याची तक्रार करण्यात आली. दरम्यान बँकेच्या चौकशी आणि ऑडिटमध्ये अनेक आदिवासी बांधवांची फसवणूक करून बँकेचे तत्कालीन अधिकारी आणि दलाल आणि त्यांचे सहकारी यांनी मिळून ३५ लाख रुपयांहून अधिक मोठा घोटाळा केल्याचे निष्पन्न झाल्यामुळे सेंट्रल बँक ऑफ इंडिया अकोलाचे क्षेत्रीय प्रबंधक विद्याधर पेडणेकर यांनी हिवरखेड पोलिस स्टेशनला फिर्याद दिली आणि बँकेचे तत्कालीन अधिकारी, दलाल, एजंट, आणि त्यांना सहकार्य करणारे इतर काही लोक अशा एकूण ११ जणांविरोधात हिवरखेड पोलिसांनी भादवी कलम ४२०, ४०९ अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

सदर आरोपींपैकी गजेंद्र रामकृष्ण गावंडे हिवरखेड, दीपक सत्यनारायण भिलावेकर चिपी, दिवाकर देवमन मंगळे बेलुरा, या तीन आरोपींना हिवरखेड पोलिसांनी अटक केली, तर क्षेत्रीय प्रबंधक तक्रार देत असल्याची माहिती काही लाभार्थींनी मुख्य सूत्रधारांना वेळीच दिल्याने मुख्य सूत्रधार रातोरात फरार होण्यात यशस्वी झाले आहेत.

आरोपींनी आदिवासींना बँकेतून शेतीवर कर्ज आणि सिंचनासाठी कर्ज मिळवून देतो अशी प्रलोभने देऊन आदिवासींच्या सह्या आणि अंगठे कागदपत्रांवर घेतले. तसंच सेंट्रल बँक ऑफ इंडिया शाखा अडगाव येथून कर्ज घेऊन कर्ज काढलेल्या रकमांचा स्वत:साठी उपयोग करून घेतला आणि आदिवासी शेतकऱ्यांना शेती उपयोगी साहित्य न देता ते त्यांना दिल्याचे रेकॉर्डला दाखवलं. अशाप्रकारे कित्येक आदिवासी शेतकऱ्यांची फसवणूक केली असल्याचे बँकेच्या चौकशीत निष्पन्न झालं आहे. दरम्यान, सध्या ११ आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपींची संख्या वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही, असं तपास अधिकाऱ्यांनी सांगितलं आहे.

## लॉकडाऊनमध्ये शहर वाहतूक शाखेची जम्बो कारवाई



अकोला : कोरोनाच्या वाढत्या प्रदूर्भावामुळे महाराष्ट्र शासनाने संपूर्ण महाराष्ट्रात मागील १५ एप्रिल २०२१ पासून कडक लॉकडाऊन जारी केला होता. अकोल्यात सुद्धा जिल्हाधिकाऱ्यांनी कडक लॉकडाऊन जारी करून काही निर्देश पारीत केले होते. त्या अनुषंगाने शहर वाहतूक शाखेने दोन महिन्यांच्या या लॉकडाऊनच्या कालावधीत एक्शन मोडवर राहून निर्देशाचा भंग करणाऱ्या तसेच वाहतूक नियमाचा भंग करणाऱ्या वाहन चालकांवर दंडात्मक तसेच गुन्हे दाखल करण्याचा सपाटा लावला होता. याअंतर्गत 15 एप्रिल ते 15 जून या दोन महिन्यात वाहतूक नियमाचा भंग करणाऱ्या एकूण 25 हजार 527 वाहनांच्या चालकांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली. त्यांच्याकडून 14 लाख 5 हजार दंड वसूल करण्यात आला आहे. तसेच लॉकडाऊनच्या नियमाचा भंग करणाऱ्या एकूण 1216 वाहन चालकांविरुद्ध शहराच्या विविध पोलीस स्टेशनमध्ये एकूण 83 गुन्हे नोंदविण्यात आली आहेत. त्यांची वाहने जप्त करण्यात आली होती.

ही कारवाई पोलीस अधीक्षक जी श्रीधर यांच्या निर्देशाने व अप्पर पोलीस अधीक्षक मोनिका राऊत, उपविभागीय पोलीस अधिकारी सचिन कदम यांच्या मार्गदर्शनाखाली शहर वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक गजानन शेळके, उपनिरीक्षक सुरेश वाघ आणि वाहतूक पोलीस अंमलदार यांनी केली आहे. आता लॉकडाऊनचे नियम शिथिल जरी झाले असतील तरी वाहनांच्या बाबतीत जिल्हाधिकाऱ्यांनी पारीत केलेल्या निर्देशाची सर्व वाहन चालकांनी पालन करून शहर वाहतूक शाखेला सहकार्य करावे असे आवाहन पोलीस निरीक्षक गजानन शेळके यांनी केले आहे.

## मंत्रालयात ओळख असल्याचं सांगत १८ लाख उकळले


मंत्रालयात ओळख असल्याने महसूल विभागाच्या राखीव कोट्यातून तलाठ्याची नोकरी लावून देतो, असे सांगत दोघांनी अकोले तालुक्यातील एका युवकाकडून सुमारे साडेअठरा लाख रुपये उखळले. अखेर आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यावर या युवकाने पोलिसांकडे धाव घेतली. पोलिसांनी दोघांविरूद्ध गुन्हा दाखल केला आहे.

शेखर नंदू वाघमारे (वय ३०, रा. अकोले) यांनी यासंबंधी अकोले पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

त्यावरून नितीन गंगाधर जोंधळे (रा. कोकणगाव, ता. संगमनेर) व विजयकुमार श्रीपती पाटील (रा. नांदेड सिटी, सिंहगड रोड, पुणे) यांच्याविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींनी त्याच्याकडून पैसे उकळलेच शिवाय परत मागायला गेल्यावर शिवीगाळ व धमकी दिल्याचाही आरोप आहे.

वाघमारे यांनी फिर्यादीत म्हटले आहे की, नातेवाईकांच्या ओळखीने जोंधळे व पाटील आपल्या संपर्कात आले. यातील पाटील हे आपली मंत्रालयात आणि मंत्र्यांकडे ओळख असल्याचे सांगत होते. या ओळखीतून अनेकांना नोकऱ्या लावून दिल्याचेही ते सांगत होते. वाघमारे यांना तलाठी पदावर नोकरी देऊ असे आश्वासन दिले. भरती नसली तरी महसूल विभागाच्या कोट्यातून नोकरी लागू शकते. त्यासाठी पैसे द्यावे लागतील असे सांगितले. पाटील जे सांगत होते, त्याची जोंधळे यांनी हमी घेतली. शिवाय पाटील यांनी यापूर्वी नोकरी लावलेल्या काही उमेदवारांची नियुक्ती पत्रेही वाघमारे यांना दाखविली होती. त्यामुळे वाघमारे यांचा विश्वास बसला. त्यांनी जुलै २०२० ते १५ मार्च २०२१ या काळात जोंधळे व पाटील यांना वेळोवेळी पैसे दिले. १४ लाख, ४५ हजार रोख दिले. तर ४ लाख, २ हजार रुपये ऑनलाइन पद्धतीने असे १८ लाख ४७ हजार रुपये दिले.

पैसे देऊन बराच काळ झाला तरीही नोकरीचे पत्र मिळाले नाही. त्यामुळे आपली फसवणूक झाल्याचा संशय वाघमारे यांना आला. त्यांनी जोंधळे यांच्याशी संपर्क साधून नोकरी नसेल तर पैसे परत द्या, अशी मागणी केली. तर उलट जोंधळे यांनीच वाघमारे यांना शिवीगाळ केली, जीवे मारण्याची धमकी दिली. त्यामुळे वाघमारे यांनी अकोले पोलिस ठाण्यात फिर्याद दिली.



पोलीस बातमी पत्र

संमिश्र

४

मुंबई, मंगळवार २२ ते २८ जून २०२१


# नवी मुंबई विमानतळाला छत्रपती शिवाजी महाराजांचंच नाव असावं – राज ठाकरे



नवी मुंबई विमातनतळ नामकरणावरुन सध्या मोठा वाद निर्माण झाला आहे. राज्य सरकारने विमानतळाला बाळासाहेब ठाकरेंचं नाव देण्याचा निर्णय घेतला असताना स्थानिकांकडून दि बा पाटील यांचं नाव देण्याची मागणी होत आहे. दरम्यान या वादावर मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी भाष्य केलं असून नवी मुंबई विमानतळाला छत्रपती शिवाजी महाराजांचंच नाव असावं असं मत मांडलं आहे. आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट घेतल्यानंतर मुंबईतील निवासस्थानी आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. “नवी मुंबईतील आंतरराष्ट्रीय विमानतळाला दि बा पाटील यांचं नाव देण्याची मागणी आहे. तर बाळासाहेबांचं नाव देण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. यातून संघर्ष होत असून पाठिंबा मागण्यासाठी माझ्याकडे प्रशांत ठाकूर आले होते,” अशी माहिती राज ठाकरेंनी दिली. “कोणतंही विमानतळ जेव्हा येतं तेव्हा ते शहराच्या बाहेर येतं. त्यामुळे तेव्हाच्या मुंबईप्रमाणे ते सांताक्रूझमध्ये आलं. नंतर वाढवत ते सहारपर्यंत गेलं आणि त्याला सांताक्रूझ आणि सहार विमानतळ असं नाव मिळालं. नवी मुंबईच्या विमानतळाचा प्रस्ताव आला तेव्हा मला आत्ताचं विमानतळ देशांतर्गत आणि ते विमानतळ आंतरराष्ट्रीय होणार अशी माहिती देण्यात आली होती. ते जरी नवी मुंबईत, पनवेलमध्ये होत असलं तरी ते मुंबई विमानतळच असणार आहे. मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ असल्याने नवी मुंबई विमानतळाला छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळच नाव राहणार असं मला वाटतं. हे सध्याच्या देशांतर्गत विमानतळाचा विस्तारित भाग आहे. हा महाराष्ट्र असून मुंबई राजधानी आहे. परदेशातून व्यक्ती महाराष्ट्रात येतो तेव्हा शिवरायांच्या भूमीत येतो. त्यामुळे आंतरराष्ट्रीय विमानतळालाही शिवरायांचं नाव असेल असं मला वाटतं,” असं राज ठाकरेंनी सांगितलं आहे.

“हे काही सिडकोनं मंजूर केलं नी राज्यानं प्रस्ताव केला असं नाही. हे केंद्र सरकारच्या अखत्यारीत आहे. त्यामुळे होणारं आंतरराष्ट्रीय विमानतळ छत्रपती शिवाजी महाराजांच्याच नावाने होईल. बाळासाहेब किंवा दि. बा. पाटील यांच्या मोठपणाबद्दल दुमत नाही,” असंही राज ठाकरे यांनी सांगितलं.

बाळासाहेब असते तर त्यांनी....

“आपण आंतरराष्ट्रीय विमानतळाबद्दल बोलत आहोत या गोष्टींचं भान असायला हवं. जे नाव आहे ते कसं बदलणार?,” अशी विचारणा राज ठाकरेंनी यावेळी केली. “बाळासाहेब असते तर त्यांनी स्वत: सांगितलं असतं की छत्रपती शिवाजी महाराजांचंच नाव असायला हवं. नामांतराचा वाद हेच दुर्दैव आहे. खरंतर विमानतळ लवकर होण्यासाठी राज्य सरकारनं रेटा लावला पाहिजे. अडचणी येत असतील तर ते सोडवण्याला प्राधान्य दिलं पाहिजे. नावात वैगेरे सगळे लोकं गुंतून राहतात म्हणून ते सोयीचं असतं. महाराष्ट्रात येणारं विमान शिवाजी महाराजांच्या भूमीत येणार त्यामुळे त्यांचंच नाव असायला हवं,” असं राज ठाकरे यांनी ठणकावून सांगितलं आहे. महाराजांचं नाव देणार असतील तर आम्ही विरोध करणार नाही असं प्रशांत ठाकूर म्हणाल्याचं राज ठाकरे यांनी यावेळी सांगितलं.

# बनावट ओळखपत्रावर लोकल प्रवास करणाऱ्यांना पश्चिम रेल्वेने ठणकावलं, म्हणाले...



मुंबईतली लोकल सेवा सध्या फक्त अत्यावश्यक सेवेतल्या कर्मचाऱ्यांसाठी सुरु आहे. मात्र, काही नागरिक अत्यावश्यक सेवांच्या बनावट ओळखपत्राच्या आधारे लोकलमधून प्रवास करत असल्याचं समोर आलं आहे. यावरुनच पश्चिम रेल्वेने अशा नागरिकांना ठणकावलं आहे. आपल्या अधिकृत ट्विटर खात्यावरुन त्यांनी ट्विट केलं आहे. या ट्विटमध्ये पश्चिम रेल्वेकडून सांगण्यात आलं आहे की, बनावट ओळखपत्राच्या आधारे प्रवास करणे हा दंडनीय अपराध आहे. त्याचबरोबर पश्चिम रेल्वेने नागरिकांना असं आवाहनही केलं आहे की, सध्या सुरु असलेल्या विशेष लोकल गाड्यांमधून केवळ महाराष्ट्र सरकारने ठरवून दिलेल्या अत्यावश्यक सेवा देणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांनीच प्रवास करावा. करोनाची दुसरी लाट ओसरत असल्याने राज्यात अनलॉकची प्रक्रिया सुरु झाली आहे. दुकाने, खासगी कार्यालयं तसंच इतर सुविधा खुल्या झाल्या असल्या तरी लोकल सेवा मात्र सर्वसामान्य नागरिकांसाठी अद्याप बंद आहे. ही सेवा सध्या केवळ अत्यावश्यक सेवेतल्या कर्मचाऱ्यांसाठीच आहे. मात्र, अत्यावश्यक सेवेचं बनावट ओळखपत्र बनवून लोकलने प्रवास करणाऱ्यांची संख्या वाढल्याचं या काळात दिसून आलं आहे. एका वृत्तपत्राने दिलेल्या बातमीनुसार, मध्य रेल्वेतही बनावट ओळखपत्राच्या आधारे किंवा तिकीटाशिवाय प्रवास करणाऱ्या नागरिकांची संख्या वाढली आहे. गेल्या ४५-४६ दिवसात २,७२५ लोक बनावट ओळखपत्र वापरुन प्रवास करताना आढळले आहेत. आत्तापर्यंत रेल्वे प्रशासनाने १३ लाख ६५ हजार रुपयांचा दंड बनावट ओळखपत्र वापरणाऱ्यांकडून वसूल केला आहे.

# रिक्षा-टॅक्सी परवाना वाटपावर मर्यादा?




मुंबई: रिक्षा-टॅक्सींच्या वाढत्या संख्येमुळे प्रवाशांना उपलब्ध होणाऱ्या सेवा, वाहतुक कोंडी इत्यादीमुळे त्यांच्या परवाना वाटपावर मर्यादा आणण्याचा निर्णय परिवहन विभागाने घेतला आहे. तसा प्रस्ताव राज्य सरकारकडे पाठवला असून तो केंद्राकडेही मंजुरीसाठी जाणार आहे. यात पाच लाख किं वा त्यापेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या ठिकाणी परवाना वाटप होणार नाही, असे प्रस्तावात नमूद आहे. मुंबईतील रिक्षा, टॅक्सी, ठाणे, पुणे, नागपूर, सोलापूर, नाशिक आणि औरंगाबाद जिल्ह्यातील रिक्षांच्या संख्येवर मर्यादा आणावी असे आदेश केंद्र सरकारने नोव्हेंबर १९९७ मध्ये दिले होते. त्यानुसार ठराविक मर्यादेबाहेर परवाने जारी होणार नाहीत, अशी तजवीज राज्य शासनाने के ली होती. त्यामुळे परवाना वाटपच बंद झाल्याने रिक्षांबरोबरच टॅक्सींची संख्याही मर्यादित राहिली होती. परंतु वाढत जाणारी प्रवासी संख्या, वेळेत या सेवा न मिळणे व प्रवाशांची होणारी गैरसोय पाहता २०१७ मध्ये रिक्षा-टॅक्सी परवान्यावरील मर्यादा पूर्णपणे काढण्याचा निर्णय घेतला. सर्वासाठी परवाने खुले होताच मागेल त्याला परवाने मिळू लागले. त्यावेळी राज्यात साडे सात लाख असलेली रिक्षांची संख्या आता १२ लाखांपर्यंत, मुंबईतील रिक्षांची १ लाख ४ हजार असलेली संख्या आता लोन लाखांहून अधिक,तर मुंबई महानगरातही सव्वा तीन लाखांपर्यंत रिक्षा झाल्या. काळ्या-पिवळ्या टॅक्सींची संख्याही ४८ हजारापर्यंत गेली. त्यांची संख्या वाढल्याने त्या प्रवाशांना उपलब्ध होऊ लागल्या. रिक्षांची संख्या वाढल्याने चालकांचे उत्पन्न विभागले गेले आणि अनेकांना उत्पन्नही मिळू लागले. वाढलेल्या संख्येमुळे त्याच्या परवाना वाटपावर पुन्हा एकदा मर्यादा आणावी अशी मागणी रिक्षा, टॅक्सी संघटनांनी परिवहन विभागाकडे केली होती. या मागणीनंतर परिवहन विभागाने परवाना वाटपावर मर्यादा आणण्याचा निर्णय घेत तसा प्रस्ताव तयार के ला व तो प्रथम राज्य सरकारकडे पाठविला.

राज्य सरकारकडून तो केंद्र सरकारकडे पाठविला जाणार असल्याचे परिवहन आयुक्त अविनाश ढाकणे म्हणाले. ५ लाख किं वा त्यापेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या ठिकाणी परवाना वाटप होणार नाही, असे प्रस्तावात नमूद आहे.

# कर्जासाठी बनावट आधार, पॅनकार्ड; ५ जण अटकेत

मुंबई : बनावट पॅनकार्ड आणि आधारकार्डच्या साहाय्याने २६ लाख रुपयांचे ई-कर्ज मिळवणाऱ्या ५ जणांना मुंबई मध्य विभागाच्या सायबर पोलिसांनी अटक केली आहे. अर्ली सॅलरी कंपनीकडून आरोपींनी ई—व्हाऊचर स्वरूपात हे कर्ज मिळवले होते. याप्रकरणी परवेज शाह, फिरोज शाह, फैज शाह, अमजद अब्दुल खान, सलीम शेख यांना पोलिसांनी अटक केली आहे.

करोनामुळे प्रत्यक्ष घटनास्थळावर जाऊन ग्राहकांची पडताळणी करणे शक्य नसल्याने ऑनलाईन पडताळणीच्या आधारेच कंपन्यांकडून ई—व्हाऊचर स्वरूपात ग्राहकांना कर्ज दिले जात होते. पंधरा आरोपींनी याचा फायदा उचलून बनावट आधार कार्ड, पॅनकार्ड आणि बँक स्टेटमेंटच्या आधारे डिसेंबर २०२० ते फेब्रुवारी २०२१ पर्यंत २६ लाख रुपयांचे कर्ज घेतले होते. आरोपींनी हे कर्ज अमेझॉन गिफ्ट स्वरूपात घेतले होते. बनावट ईमेलच्या आणि सिम कार्डच्या आधारे आरोपींनी या गिफ्टचा वापर करून टीव्ही, फ्रीज, मोबाईल, एसी, वॉशिंग मशीन आदी वस्तू खरेदी केल्या होत्या. दरम्यान, आरोपींनी कर्ज परतफेड न केल्याने कंपनीने त्यांच्याविरोधात सायबर पोलिसांकडे तक्रार दाखल केली होती. पोलिसांनी तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे पाच आरोपींचा ठावठिकाणा शोधून काढला. पोलिसांनी त्यांच्याकडून ६० बनावट आधार कार्ड, ६३ पॅनकार्ड आणि आरोपींनी खरेदी



केलेल्या ५ लाख ७१ हजार रुपयांच्या वस्तू जप्त केल्याची माहिती पोलीस निरीक्षक संजय गोविलकर यांनी दिली.

# दादर बाजारपेठेत निर्बंध डावलून गर्दी




मुंबई : नव्या नियमानुसार बाजारपेठांना व्यवसायासाठी परवानगी देण्यात आली असली तरी शनिवार आणि रविवारी गर्दी टाळण्याच्या उद्देशाने सक्तीने बंद पाळण्याचे आदेश पालिकेने दिले आहेत. असे असतानाही दादर बाजारपेठेत मात्र निर्बंध डावलून फेरीवाले दुकाने थाटत आहेत. परिणामी, खरेदीसाठी लोकांची झुंबड उडते आहे. दादर बाजारपेठेत नियमांची पायमल्ली करत शनिवारी आणि रविवारी फेरीवाल्यांनी मोठ्या संख्येने ठेले लावले होते. काही दुकानदारांनीही अर्धे दार खुले ठेवून विक्री सुरू ठेवली होती. दादरसह मुंबईतील विविध बाजारपेठांमध्ये हेच चित्र होते. गर्दीवर नियंत्रण मिळवण्यासाठी पालिका आणि पोलीस यंत्रणाही प्रयत्नशील होत्या, परंतु ‘सुट्टीच्या दिवसांमध्ये अधिक ग्राहक येत असल्याने आम्हाला हाच कमवण्याचा हंगाम असतो.

# ॲम्फोटेरेसीन-बी इंजेक्शनचा काळाबाजार

ठाणे : म्युकरमायकोसिसच्या उपचारासाठी महत्त्वाच्या असलेल्या ॲम्फोटेरेसीन-बी या इंजेक्शनचा काळाबाजार केल्याप्रकरणी ठाणे पोलिसांनी तिघांना अटक केली आहे. निखील पवार, अमरदीप सोनावणे आणि प्रग्णेशकुमार पटेल अशी अटकेत असलेल्या आरोपींची नावे आहेत. निखील आणि प्रग्णेशकुमार हे औषध निर्मिती कंपनीमध्ये काम करतात. तर अमरदीप हा मुंबई महापालिकेत क्लीनअप मार्शल म्हणून काम करतो. पोलिसांनी त्यांच्याकडून १४ इंजेक्शन जप्त केले. तिघेही हे इंजेक्शन मूळ किमतीच्या दुप्पट दराने विक्री करत असल्याचे चौकशीत समोर आले आहे. ॲम्फोटेरेसीन-बी या इंजेक्शनची दुप्पट दराने विक्री सुरू असल्याची माहितीकापूरबावडी पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलिसांनी अन्न व औषध प्रशासनाच्या मदतीने सापळा रचून निखील आणि अमरदीप या दोघांना अटक केली.

# कांदिवलीच्या हिरानंदानी सोसायटीतील लसीकरण बोगसच

## लसीचा खरेखोटेपणा होणार मंगळवारी उघड



पश्चिम उपनगरातील कांदिवली भागातील हिरानंदानी सोसायटीत ३० मे रोजी खासगी लोकांमार्फत पार पडलेले लसीकरण बनावट असल्याचे मुंबई महापालिकेच्या चौकशीत उघडकीस आले आहे. मात्र, त्यासाठी वापरलेली लस खरी होती की खोटी? आणि ती कोणी, कशी मिळवली? याबाबतची गोपनीय माहिती पुणे येथील लस उत्पादक ‘सिरम इन्स्टिट्यूट’च्या तपासणी अहवालातून मंगळवारपर्यंत उघड होणार आहे. यासंदर्भातील माहिती अतिरिक्त आयुक्त सुरेश काकाणी यांनी दिली आहे. कांदिवली येथील बनावट लसीकरण प्रकरण पोलीस आणि पालिकेच्या चौकशीत उघडकीस आले आहे. हिरानंदानी सोसायटीमधील ३९० रहिवाशांना कोविड प्रतिबंधक लस ३० मे रोजी देण्यात आली. त्यासाठी प्रत्येकी १२६० रुपये याप्रमाणे एकूण ४ लाख ९१ हजार ४०० रुपये या लाभार्थी रहिवाशांनी दिले. मात्र, कोणालाही लसीनंतर त्रास झाला नाही. त्यामुळे संशय आला व त्यातूनच हे लसीकरण बनावट असल्याचे समोर आले. सोशल मीडियावर याबाबत बरीच चर्चा झाली. त्यामुळे जर लसीकरण प्रकार बनावट होता, तर लस खरी की खोटी? असा प्रश्न निर्माण झाला. पालिकेने सदर लसीकरणात वापरलेल्या लसीचे बॅच नंबर पुणे येथील लस उत्पादक ‘सिरम इन्स्टिट्यूट’मध्ये तपासणीसाठी पाठवण्यात आले आहेत.

# टाळेबंदीत खारफुटींची बेसुमार कत्तल

ठाणे : मुंब्रा येथील देसाई खाडीत भूमाफियांनी खारफुटींची कत्तल करून मुंब्रा ते दिवा यांना जोडणारा दोन किलोमीटर लांबीचा रस्ता बांधल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. करोनामुळे लागू करण्यात आलेल्या टाळेबंदीच्या काळात हा रस्ता बांधण्यात आला आहे.

ठाणे जिल्ह्यातील खारफुटींचे रक्षण करण्यासाठी राज्य सरकारने काही महिन्यांपूर्वीच खाडीकिनारी असलेल्या खारफुटींचे क्षेत्र हे राखीव वनक्षेत्र म्हणून घोषित केले आहे. याच खाडीचा काही भाग फ्लेमिंगो अभयारण्यासाठी आरक्षित करण्यात आला असून काही क्षेत्र पर्यावरणदृष्ट्या अत्यंत संवेदनशील गटात राखीव ठेवण्यात आले आहे. राज्याच्या पर्यावरण विभागाचा कार्यभार आदित्य ठाकरे यांच्याकडे आल्यानंतर त्यांनी खारफुटी संवर्धनासाठी वेगवेगळे उपक्रम राबवण्याच्या सूचना संबंधित विभाग तसेच जिल्हा प्रशासन स्तरावर केल्या. या प्रयत्नांमुळे राज्यासह ठाणे जिल्ह्यातील खारफुटी क्षेत्राला मोठे संरक्षण मिळेल, अशी आशा एकीकडे पर्यावरणप्रेमींमध्ये व्यक्त होत होती. त्याच वेळी दुसरीकडे ठाणे जिल्ह्यातील ठराविक भागात राजरोसपणे खारफुटी कापली जात असल्याचे चित्र आहे.

नवा रस्ता, नवी बांधकामे

ठाणे शहराला लागून असलेल्या मुंब्रा आणि दिवा शहराला जोडणारा मुंब्रा चूहा पूल ते दिवा येथील साबेगावपर्यंत दोन किलोमीटर लांबीचा रस्ता खारफुटी कापून भूमाफियांनी तयार केल्याचा प्रकार समोर आला आहे. ही खारफुटी कापून १० हजारांपेक्षा अधिक ट्रकभर राडारोडा येथे टाकण्यात आल्याचा अंदाज पर्यावरणवादी संघटनांकडून केला जात आहे. हा रस्ता रुंदीलाही मोठा आहे. त्यामुळे रस्त्याच्या कडेला काही गाळेही उभारण्यात आले आहेत. मुंब्रा येथून थेट दिव्याला जोडणारा हा रस्ता असल्याने वाळू माफिया, रेती उपसा करणाऱ्यांसाठी हा रस्ता तयार केला गेला असावा, असे मत पर्यावरणवादी कार्यकर्ते व्यक्त करत आहे.

याआधीही प्रयत्न...

यापूर्वी २०१० मध्ये याच ठिकाणी रस्ता उभारण्याचा प्रयत्न भूमाफियांकडून झाला होता, पण हा प्रयत्न पर्यावरणवादी संघटनांनी हाणून पाडला होता. त्यानंतर २०१७ मध्ये चूहा पूल येथे काही प्रमाणात अनधिकृत बांधकाम झाले होते. मात्र, दोन वर्षांमध्ये भूमाफियांनी मातीचा भराव, राडारोडा टाकून दोन किलोमीटरपर्यंत खाडी बुजवली आहे.

हेच का संवर्धन? जिल्ह्यात पहिल्यांदाच एखाद्या विभागात इतक्या मोठ्या प्रमाणात खारफुटींची कत्तल झाली असल्याचा अंदाज आहे. खारफुटी संवर्धनासाठी राज्य तसेच जिल्हास्तरावर नेते आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांकडून मोठमोठ्या घोषणा केल्या जात असतानाही हा प्रकार घडल्याबाबत पर्यावरणप्रेमी संताप व्यक्त करत आहेत.



## भूमाफियांकडून मुंब्रा ते दिवा दोन किमी रस्त्याची बांधणी; पर्यावरणप्रेमींकडून संताप

अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष? टाळेबंदीच्या कालावधीत हा रस्ता तयार करण्यात आल्याची माहिती पर्यावरण कार्यकर्त्यांनी दिली. ठाणे महापालिका तसेच जिल्हा प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी या प्रकाराकडे डोळेझाक केल्याचे चित्र असून आयुक्त डॉ.विपीन शर्मा आणि जिल्हाधिकारी राजेश नार्वेकर यांच्या अखत्यारीत कार्यरत असणाऱ्या अधिकाऱ्यांच्या कार्यक्षमतेविषयी यामुळे प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. यासंदर्भात कोकण आयुक्त तसेच राज्य खारफूटी संवर्धन कक्षाकडे तक्रार करण्यात आली आहे. भूमाफियांवरील राजकीय आशिर्वादाशिवाय इतका मोठा रस्ता तयार होणे शक्य नाही.


हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. 4, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. 2, गोरेगांव (पूर्व), मुंबई - 400 063 येथे छापून 2, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - 401 105 येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत). संपर्क:-9594418181 / 8424989898